Impact Factor
5.307 (SJIF)

**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# तुरूंगवाडा कादंबरीतून आलेले समाजदर्शन

**संशोधक विद्यार्थी**
**सौ. वर्षा कृष्णा रंदई (चौके)**
एम.ए.(मराठी), बी.एड
सेट (संस्कृत), नेट (मराठी)
मो. 9423409085

**मार्गदर्शक**
**डॉ. गणेश चव्हाण**
एम.ए.(मराठी), एम.फील., पीएच.डी.
मराठी विभाग प्रमुख
संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा,
नागपूर

---

**प्रास्ताविक :**

'तुरूंगवाडा' ही लक्ष्मीकमल गेडाम यांची साहित्यकृती आहे. समाजजीवनाचे दर्शन, 'तुरूंगवाडा' कादंबरीतून समाजदर्शन या प्रस्तुत शोधनिबंधातून घेतलेला आहे. अगदी लहानपणापासून ते समजत्यावयापर्यंत पाटील, पाटीलपण व त्यांचे वाडे यांच्यात बराच काळ सूक्ष्म निरीक्षण केलेल्या लेखिकेने पाटीलकी त्यांची श्रीमंती, चालीरिती, वैभव तसेच पाटीलांचा रग्गेलपणा, रंगेलपणा सूक्ष्मपणे टिपला आहे. त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणांचे दर्शनच जणू तुरूंगवाड्यात उतरलेले दिसते. कादंबरीतून दैनंदिन जीवनात जीवन व्यतीत करीत असतांना अंतर्मनाने टिपलेले समाजाचे वास्तवदर्शन कादंबरीत दिसते. साहित्यकृती निर्माण करणारा लेखक हा नेहमीच समाजाचा घटक असतो, त्यामुळे भटकंती करत असतांना वेगवेगळ्या सामाजिक परिस्थितीचा अनुभव घेत असतांना, समाजातील लोकांकडे, घटनांकडे, अनुभवांकडे बघण्याचा लेखकांचा दृष्टिकोन यातून लेखकांच्या बौद्धिक, वैचारिक, मानसिक व आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब साहित्यकृतीत उमटते. लेखकांच्या याच सामाजिक विचारधारा साहित्यकृतीच्या वाङ्मयीन मूल्यांच्या अनुषंगाने महत्त्वाचा भाग बनतात. साहित्यकृतीच्या सामाजिकतेबद्दल अविनाश सहस्त्रबुद्धे 'समाज व साहित्य' या ग्रंथात लिहितात, ''श्रेष्ठ साहित्यकृतीचे मूल्य केवळ वाङ्मयीन नसते, ते सामाजिक असते मानवी अनुभवांचा सखोल अर्थ व आकार श्रेष्ठ साहित्यकृतीत व्यक्त झालेला असतो.''[१] या अनुषंगाने 'तुरूंगवाडा' या कादंबरीत सामाजिक दृष्टिकोनातून वाड्यात घडणाऱ्या घटनांकडे लेखिका कोणत्या नजरेतून बघतात हेही महत्त्वाचे ठरते. वाडा संस्कृतीत वावरत असतांना पाटलांचा, पाटलकीचा त्यातील हेवेदावे, हाडवैर, द्वेषाची भावना, पाटलीणींच्या कथा व व्यथा जवळून अनुभवण्याचे लेखिका स्वत:चे समाजजीवनाशी कळत नकळत तुलना साहित्यकृतीत करतांना दिसतात. साहित्यकृतीतून वाचकांनी अनुभवलेले समाजजीवन या अनुषंगाने इथे विद्या व्यवहारे यांचे 'साहित्य विमर्श' यातील विधान महत्त्वाचे वाटते. त्या लिहितात, ''साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास करताना, लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाचा पैलू तो ज्या

समाजात वावरतो त्या समाजाची जीवनपद्धती, लेखकांची बांधिलकी, त्याच्या काळातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन स्थिती, त्या साहित्यनिर्मितीचे स्वरूप, त्यातील आशय, त्या साहित्यकृतीत वाङ्मयीन मूल्ये, इ. बाबी लक्षात घ्याव्या लागतात. या विधानाला संयुक्तिक लेखिका लक्ष्मीकमल गेडाम यांच्या 'तुरूंगवाडा' या साहित्यकृतीतून समाजजीवनाचा शोध घेतलेला आहे.

**सांकेतिक शब्द :**

तुरूंगवाड्यातील समाजदर्शन, प्रथा, परंपरा, रूढी, ऑक्टोपस, नेत्रादमस

**'तुरूंगवाडा' कादंबरीतून आलेले समाजदर्शन :**

लक्ष्मीकमल गेडाम लिखित 'तुरूंगवाडा' या कादंबरीत लेखिका सिद्धहस्त, समाजप्रिय, सूक्ष्मनिरीक्षक व ग्रामीण जीवन, चालीरीती, जीवनपद्धती जवळून अनुभवल्याचे त्यांच्या लेखनातून दिसून येते. कादंबरीत पहिल्या प्रकरणात, या कादंबरीची सुरूवात मुळातच ग्रामीण जीवनाच्या दैनंदिन कामातून, सकाळच्या कामांनी सुरू करून भारतीय संस्कृतीचे, ग्रामीण संस्कृतीचे प्रथम दर्शन घडवून दिले. दादासाहेब म्हणजेच कादंबरीचा नायक, यांच्या विवाह बैठकीसाठीची तयारी करतांना सडासारवणापासून केल्याचे वर्णन आहे. पाटलांच्या व श्रीमंताच्या घरी सडासारवणास घरगडी असायचे, जसे ''काय गा धोंडू अज तिघं तिघं झुंजरकंच सडा टाकून रायले. काही इसेस हाये का गा वाड्यात?''[3] असा ग्रामीण तसेच वाडा संस्कृतीची व ग्रामीण बोलीभाषेची ओळख करून देणारा उद्‌गार गजूच्या तोंडून लेखिकेने वर्णिला आहे. कोंबड्याची बाग देणे, व्यवसायासाठी पहाटेच उठणे, सडासारवण करणे इ. गोष्टीचे वर्णन केले आहे. मुला—मुलींना पाहायला जावून, योग्य तोलामोलाचे स्थळ पाहून लग्न जोडणे, लग्नानंतर वरात काढणे, गृहप्रवेशाच्या वेळी नवऱ्या मुलीने पायाने माप ओलांडणे, नवरीबरोबर सुवासिनी म्हणून एखादी स्त्री मुद्दामच फिरती वरात येईपर्यंत सोबत देणे, लग्नात आंदण देणे इ. पद्धतीचे समाजदर्शन लेखिका करवून देतात. मोठ्या, प्रतिष्ठित लोकांना मानाने बोलविणे, त्याच्या नावापुढे उपाधी लावणे उदा. पंढरी चौधरीला म्हणजे पाटलाचे नाव न घेता सर्वांनी त्यांना आबाजी म्हणणे तर मुलगा दिनेश चौधरीला दादासाहेब ह्या उपाधीने बोलविणे इ. पद्धत दिसून येते. लग्न जोडतांना पहिल्या वराला नकार न देणे, लग्नानंतर सत्यनारायणाची पूजा करणे व कुलदेवतेला किंवा देवदर्शनाला नवीन जोडप्याने जाणे, वाड्याची मानमर्यादा सांभाळणे इ. रीतीसुद्धा सांभाळल्या जातात याची लेखिका नोंद घेते.

तुळजापूरच्या देवदर्शन प्रवासातून लेखिकेने समाजातील फसवेगिरीचे दर्शन करून दिले. संधीसाधू लोक भाविकांना कसे फसवितात. चोर, भुरटे कसे फसवितात व आपले उपजिवेकेचे साधन म्हणून भाविकांच्या भावनेचा कसा वापर करतात

Research Hub International Journal

यावरही लेखिका प्रकाश टाकतात. 'मले परसाद द्या – मले परसाद द्या.' म्हणणाऱ्यांचा एकच गलका झाला. इथे आजूबाजूच्या गावचे चोर उचक्के नेहमीच येतात. त्यांचा धंदाच चोरीचा, त्यामुळे नवीन यात्रेकरू बधून ते गर्दी करतात. कधी दर्शनाच्या निमित्ताने तर कधी प्रसाद मागण्याच्या/वाटण्याच्या निमित्त्याने'[४] सोनं सापडणे वा सोनं हरविणे यामागील शकुनअपशकुन गैरसमजाचा उल्लेख केला आहे. नायिकेचे देवदर्शनाला गेल्यावरच तुळजापूरला सोनं चोरं लुटतात. पुष्पाला गर्भधारणा झाली हेही रखमा कोड्यातचं सांगतांना दिसते. ''तुमीई खूबच भोळ्या जी बाई। आता ह्या वाड्यात लहानसे पाटील येणार हायेत''[५] गर्भधारीणीला आनंद वाटावा म्हणून डोहाळजेवणाची प्रथा वर्णन करण्यास लेखिका विसरत नाही. तब्बल तीन कडव्यांचे डोहाळे गीत लेखिकेने रचले आहे. एकत्र कुटुंबपद्धती ही ग्रामीण जीवनाचा कणा आहे. म्हणूनच सर्व रिती रिवाज पाळतांना सहकुटूंब एकत्रित आलेले आपल्याला दिसते. डोहाळेजेवण, बारसे, हळदीकुंकू, उखाणे घेणे. इ. कार्यक्रमातून एकत्रित कुटूंब व स्त्रियांचे घरातील दुय्यम स्थान, घरापुरते सिमीत वास्तव्य, पुरूषांचे व्यसन, प्रतिष्ठेसाठी भाऊबंदकीचे आपसातले हेवेदावे, वैर व तिचे पिढ्यांपिढ्या हस्तांतरणाचे वर्णन केलेले आहे. पाटलांच्या पाटीलकीचे भारदस्त वर्णन, त्यांच्या सवयी, त्यांच्यातील हाडवैर, आवडीनिवडी व मनोरंजनाचेही या कादंबरीत वर्णन आले आहे. तमाश्यांचे फड, त्यातील तमासखोरीणींचा नखरा व त्यावर भाळणारे पाटील मंडळी व त्यातून होणारी त्यांच्या कुटुंबाची व जीवनाच्या वाताहतीने मन हेलावून जाते. कुटुंबाचे वैभव हे स्त्रियांमुळे असते हे देवका पाटलीण, रेणूका पाटलीण, यांच्या वर्णनातून लेखिका समाजाला पटवून देतात. ग्रामीण जीवनातील दंवडी देणे, माल्याच्या हाताने कार्यक्रमांचे निमंत्रण देणे, ग्लास, वाटी, ताट घेवून जेवायला जाणे इ. पूर्वपार पद्धतीचे लेखिका वर्णन करतात. संदीप, समताच्या बारश्याच्यावेळी आबाजी पाटलांनी गावजेवण दिले त्यावेळी या पद्धतीचे लेखिकेने वर्णन केले आहे. आपले काम काढून घेण्यासाठी चिरीमिरी देणे, साहेबांना पार्टी देवून खुश करणे इ. समाजविघातक पद्धतीवरही लेखिका प्रकाश टाकतात, दिनेशला बँक घोटाळा प्रकरणातून सोडविण्यासाठी आबाजींच या मार्गांचा वापर करतांना दिसतात. उदरनिर्वाहासाठी वैद्यकी करणे, जादूटोना करणे, करणी करणे, त्यावरील उपाय, बळी देणे, नवस करणे, रोग्यांच्या उपचारासाठी घरगुती उपाय करणे, लोकांची फसवणुक करणे, जंगली प्राण्यांचे मांस खाणे, दारू काढणे, दारू पिणे इ. कामे समाजातील सामान्य जनता करीत असे. ''न्हाई ब्बा! डुकरं कायेल व्हाये जी थे! सांगतलं ना इथ डुक्कर औसिदायलेबी न्हाई म्हुन, काल हरी चांभार ढोर उधडत व्हाता. नदीपडल्याड काल गावात कोणताचं बैल मेला ना जी.''[६] ढोर उधडण्याच्या पद्धतीचे वर्णन व समाजवास्तव लेखिकेने चितारले आहे.

पाटलांच्या चोरट्या छंदाचे व धंद्याचे गुपित राखण्यासाठी विशेष माणसाची

नेमणूक करणे अशा पद्धतीही त्या काळात होत्या असे लेखिका लिहितात. संत्राचा व्यापार, संत्र्याचे उत्पादन, संत्राच्या झाडाला बेगण्या लावणे, काम न केल्यास नागा (सुट्टी) कापणे इ. प्रकार समाजात होते. मृत व्यक्तीचे भूत फिरणे, आवाजाचा भास होणे, चकवा, भानामती इ. अंधश्रद्धा लेखिका वर्णन करतात. पूर आल्यानंतर पूराचे पाणी ओसरण्यासाठी पाटलाने नदीची पूजा करून उलट्या पायलीने पाणी मोजले तर पूर ओसरतो अशी समज ग्रामीण लोकांची होती. तर १९९१ साली आलेल्या मोवाडच्या पूराचाही उल्लेख इथे केला आहे.

आदिवासी समाजातील गळाचे वर्णन त्यातील त्यांच्या प्रथा, परंपरा त्यामागील श्रद्धा, अंधश्रद्धा यांचेही लेखन लेखिकेने केलेले आहे. ''कार्यक्रम नाही तर काय! मी नरखेडच्या गळाबद्दल आजवर खूप ऐकून होते.''[७] आदिवासींच्या ह्या गळ प्रथेला ऐतिहासिक ठेवा म्हणून जपण्याचे कार्य या कादंबरीच्या निमित्याने झाले. दिवाळी, होळी, (गावदेवीला पाणी नेणे) इ. प्रमुख उत्सव सणासोबत देवी अंगात येणे, गावदेवीला मातामायला पाणी नेणे, भगतीनीच्या ईच्छा पुरविणे, गावजेवण देणे, कडूलिंबाच्या डहाळ्या नेणे, दहीभाताचे बोणं चढविणे, वाजत—गाजत देवीचे गाणे म्हणणे, देवीला गऱ्हाणे सांगणे, कौल मागणे, इ. प्रथा परंपरा या कादंबरीत प्रकर्षाने दिसून येतात. चकव्याची चकविण्याची शिकार खुद्द कादंबरीची नायिका आहे. ''टेंभूरडोहाजोळ आलो आन् दचकलोच'' ''कोन व्होये व बाई तू?'' ''म्हन्लं पाटलीनबाई''[८] चकव्याच्या तावडीतून सुटण्यासाठी चामड्याच्या चप्पलेचे पाणी पाजणे इ. उपाय समाज करीत असल्याचे लेखिका वर्णन करतात.

देवीला पाणी नेतांना गाणे म्हणणे हा मौखिक वारसा जतनांचा प्रकार लेखिका वर्णन करतात. ''आली आली का मातामाय खारकीच्या व बनातून। मोती फेकले गाडीतून व माय ये माझे मातामाय।''[९] त्याचबरोबर अंगात देवी आणुन देवीच्या मंदिराचा जीर्णोद्वार व सुधारणेचे बीज पेरण्यात लेखिका यशस्वी झाल्याचे दिसते. एक दुसऱ्यांचे उणेउपरे त्या व्यक्तीच्या अपरोक्षात काढणे ही स्त्री स्वभावाची उणीव लेखिकेच्या लेखणीतून सुटत नाही. तर पूजेसाठी आणलेल्या वस्तूंवर डोळा ठेवून प्रसंगी त्यासाठी झोंबाझोंबी करणाऱ्या स्त्रियांचे वर्णन करून गरिबीचे वर्णन, त्यांच्या जीवनाची ओढगस्ती लेखणीतून उमटते.

झिबल्या व त्यांच्या कुटुंबाच्या हालअपेष्टा वर्णन करून त्यासाठी चालविलेले सामाजिक शोषण, फसवेगिरी व भावनांशी चाललेला खेळ वर्णितांना उचल्या छत्तीसगडी समाजाच्या व्यवथाही लेखिका मांडतात. नरखेडला जवळ असलेली सीमा मध्यप्रदेश व तेथून कामासाठी येणारे छत्तीसगडी मजूर मजूरीसाठी कसे वणवण भटकतात व त्यांच्या जीवनाची कशी फरफट होते. ते झिबल्यासच्या पात्रातून उत्तम चितारले आहे. ''लई कामाचा कागुद हाये साह्येब! आमच्या मुलखात

Research Hub International Journal

याले गाव सोडाचा दाखला म्हन्तेत!........ पाटलाने याच्यावर सही केली का मंग कोनी आमाले चोर समजत न्हाई, न्हाइत ह्या दाखल्याबिगर गावची सीवई आमाले वलांडता येत नाही. परथाच हाये हे आमच्या मुलखातली.''[१०] पुष्पाला परिस्थितीने शिक्षिकेची नोकरी करावी लागल्याने तिच्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन, तिचे मनाचे खच्चीकरण, टोमणे, चांगल्या कामापासून परावृत्त करण्याचा समाजाचा दृष्टिकोन, लावालावी करणे, अडथळे आणणे, चारित्र्यावर संशय घेणे, कुजबुज करणे, फुट पाडणे, राईचा पर्वत करणे, आगीत तेल ओतणे अशा समाजविघातक कृतींचे वर्णन कादंबरीत दिसून येते. इथे समाजाचे तत्कालीन वास्तव चितारले आहे.

शेकोटी पेटविणे त्याभोवती बसून रिकामपणीच्या गोष्टींचे भांडवल करत बसणे, बऱ्या वाईट गोष्टींची उलटसुलट चर्चा करणे, बिडी ओढणे, खबरेगिरी करणे, आग लावणे, अफवा पसरविणे, वाईट गोष्टींचे चर्वितचर्वण करणे, निरक्षरता, टिंगल टवाळी करणे, पाटलाच्या पाटीलकीने गाव गाजले पण इथे सुविधांचा सुकाळ असून बससेवा मात्र नाही. फायदा असला तर लोक तोंडपुंजेपण करतात पण अडचणींच्या काळात त्याच गोष्टींचे भांडवल करतात.

कांदबरीचा नायक चुकीचे वागतो, पुष्पाचे वागणे बरोबर असूनही दरारा मात्र पतीचाच असतो. चुका लक्षात येवूनही शाहजोगासारखे वागणे हे स्त्रीला दुय्यम स्थान देवून वागण्याचे हे समाजाचे दर्शनच आहे. विपरीत परिस्थितीत जो सोबत असतो वा सोबत देतो तोच खरा मित्र रामभाऊ देशमुखाने तो आबाजीला दिला. तर साठे संरांसारख्या प्रामाणिक शिक्षकाला दिनेश व गावकऱ्यांनी गैर समजले हा समाजाचा अनुभव. जसा दृष्टीकोन असेल तसे समाजचित्रण करते ही वास्तविकता लेखिकेने वर्णन केली आहे. समाज चांगल्या चांगले म्हणत तर नाहीच पण चांगले करूही देत नाही हे साठेगुरूजींच्या बदलीवरून कळून येते. पत्ते खेळणे, जुव्वा खेळणे, रिकामा वेळ टवाळक्या करण्यात घालविणे, सट्टा लावणे, समाजहित न चिंतणे इ. वाईट सवयींचे वर्णन कादंबरीतून रेखाटले आहे. वाडा भरण्याची पद्धत लेखिकेने वर्णन केलेली आहे. चैत्र—वैशाख या दोन महिन्यात नरखेड व आजूबाजूच्या खेड्यात (आबाजी पाटलाच्या मौद्यात) ही प्रथा रूढ असल्याचे वर्णन केले आहे. ''परंतु आता अनुभवाने मला सर्व कळलंय. वाडा भरण्याची पद्धती आणि त्याचं महत्त्वही!''[११] समाजाच्या बारीकसारीक रितीरिवाजांचे, प्रथा, परंपरा रूढींचे सूक्ष्म अवलोकन असल्याने लेखनातून त्यांचे वर्णन करून एक प्रकारचा वारसा लेखिकेने जोपासला आहे. यात चांगल्या रितीभातीचे उद्दात्तीकरण करून वाईट चालरितींना वैज्ञानिक दृष्टिकोन देवून समाजमनाला प्रात्याक्षिकाद्वारा सुशिक्षित विचारांची पेरणी लेखिकेने केलेली दिसते. समताला कांजण्या निघाल्यावर ग्रामीण प्रथेप्रमाणे देवीला पाणी नेण्याचे रखमा मालकिणीला गळ घालते. पण ती प्रथम डॉक्टरांना दाखवून देवू व मग इतर उपचार करू असे सूचविते. तसेच गावात

Research Hub International Journal

भानामतीचा प्रकार व त्याचा उत्पात थांबविण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यकर्त्यांचा आधार घेवून ती खऱ्या गुन्हेगाराला शोधून काढते. लोकांच्या मनातील संभ्रम दूर करते. ग्रामीण भागात वास्तव्य करून नायिका सुशिक्षित व सुविचारी, तर आबाजी ग्रामस्थ असून स्त्रीदाक्षिण्यात अग्रेसर रेखाटले आहे. प्रसंगी नायिका वाईट प्रसंगाला, परिस्थितीला तोंड देतांना काळानुरूप स्वत: बदल करून सुधारणेला महत्त्व देते. समताच्या आंतरजातीय विवाह, तिचे परिस्थितीनुसार वर्तन बदल, ध्येयावरील निष्ठा, अन्यायाचा प्रतिकार, मुलांच्या हक्कासाठी लढा, परिस्थितीशी समायोजन, सत्याची बाजू राखणे, सर्वांचा विचार करणे इ. सकारात्मक वागणूक एक मूल्याधिष्ठित समाज निर्मिती कराते. ऑक्टोपस सारख्या जीवशास्त्रीय शब्दाचा वापर करून नायकाची दशा वर्णन करतांना आपल्या सखोल ज्ञानाची चुणुक इथे दाखवली असे दिसते. तसेच 'नेत्रादमस' या ज्योतिष्यज्ञांचा उल्लेख करून १५ व्या शतकातील भाकीत केलेल्या भविष्यवाणीची माहिती समाजाला करून दिली. यावरून लेखिकेचे चौफेर ज्ञान दृष्टीपथास येते. भाषिक दृष्ट्याही ही कादंबरी सर्वोत्कृष्ट ठरली आहे. कारण मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांचा वापर लेखिकेने सहज केला. वाक्प्रचार, म्हणींचा अतिउत्कृष्ट वापर हे या कादंबरीचा दागिना आहे. तब्बल ७१ म्हणींचा वार केलेला दिसतो. भाषिक सौंदर्यही दर्जेदार आहे. २६२ वाक्यप्रचारांचा सुलभरीतीने वापर केला आहे. पृष्ठ ८९ वर चक्क एकाच पानावर १२ वाक्यप्रचारांचा वापर करून लेखिका शब्दप्रभू असल्याचे सिद्ध झाले आहे.

**समारोप :**

ग्रामीण भागातील जीवनाचे इत्यंभूत वर्णन येथे आले आहे. व्यक्तिरेखा जरी ग्रामीण असल्या तरी सुधारकी थाटाच्या लेखिकेने वर्णन केलेल्या आहे. शीर्षक जरी 'तुरूंगवाडा' असले तरी प्रत्येक पात्र अवस्थेतून आपली सोडवणूक करतांना दिसते. अन्याय अत्याचाराचे निर्मूलन व स्वत:च्या अधिकारासाठी संघर्ष करीत ही कादंबरी वाचकांच्या मनात सकारात्मकता व आशावाद पेरण्यास समर्थ ठरली आहे.

**निष्कर्ष :**

१) तत्कालीन व सद्यपरिस्थितीचे ग्रामीण जीवनाचा तुलनात्मक अभ्यास करण्यास उपयोगी ठरते.

२) वाडा भरणे, गळाची प्रथा, इतरही चालीरिती, प्रथा, परंपरा, मौखिक वारसा जोपासणारी ऐतिहासिक दस्ताऐवज म्हणून कादंबरी आदर्श ठरते.

३) परंपरागत पद्धतीला उदात्त रूप देवून वैज्ञानिक व सुधारकीचे बीज रोवल्या गेल्याने ही कादंबरी नवविचार प्रसवा ठरते.

**संदर्भसूची :**


- सहस्त्रबुद्धे अविनाश 'समाज आणि साहित्य' लोकवाङ्मय, गृहमुंबई, प्र.आ. १९८०, पृ. ४

- व्यवहारे विद्या, ‘साहित्य विमर्श’, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जानेवारी २००३, पृ. ६४
- गेडाम लक्ष्मीकमल, ‘तुरूंगवाडा’, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, प्र.आ. जुलै २००४, पृ. १
- तत्रैव पृ. १०
- तत्रैव पृ. १२
- तत्रैव पृ. ५४
- तत्रैव पृ. ६३
- तत्रैव पृ. १२९, १३०
- तत्रैव पृ. ११४
- तत्रैव पृ. ५२
- तत्रैव पृ. १७१


Research Hub International Journal